Literacy for a Billion

Movie: Pandhar
Year: 2004

Song: Sajni Ye Na Sanj Mohare
Lyricist: Gajendra Ahire

सजनी ये ना सांज मोहरे
सजनी ये ना सांज मोहरे
विसरूनी जाऊ जगाला
जगाला या
सजना ये ना प्रीत फुले रे
सजना ये ना प्रीत फुले रे
विसरूनी जाऊ जगाला
जगाला या
सजनी ये ना
सजना ये ना

इंद्रधनुचे सात रंग हे
आज अचानक खुलून आले
फुलांफुलांतून दवबिंदूनी
सप्तसूर हे पहा छेडीले
बघ सात रंग अन् सप्तसूरांचा
संगम झाला
सजना ये ना प्रीत फुले रे
सजनी ये ना सांज मोहरे
विसरूनी जाऊ जगाला
जगाला या
सजनी ये ना
सजना ये ना

युगायुगांची प्रीत आपली
शतजन्मीचे नाते जुळले
दोन जीवांची ओळख पटली
मीपण आपुले विरून गेले
बघ स्वर्ग सुख ही उणे वाटते
या समयाला
सजना ये ना प्रीत फुले रे
सजनी ये ना सांज मोहरे
विसरूनी जाऊ जगाला
जगाला या
सजनी ये ना
सजना ये ना
सजनी ये ना
सजना ये ना

Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.

PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.